# शिक्षणाचे शिल्पकार–आण्णासाहेब लठ्ठे

गीतेमध्ये लोकोत्तर लोकांची लक्षणे विशद करताना अंतःकरण आणि देह यांचा संयमन करुन ही माणसं निरिच्छ असल्याचे सांगून आपल्यापैकीही प्रत्येकाच्या जीवनात असं एखादं पूजास्थान असावं असं वाटत असतं असं म्हटलंय. तिथं दैवी प्रेमाची साठवण असते आणि तीच प्रणवाची पेठ असते. थोर संत माहात्म्यांचा सहवास म्हणजे सर्वसामान्यांच्या जगण्याची संजीवनी असते आणि सर्वसामान्यांचा जगण्याचा तो आधार असतो. असे थोर महात्मे जणू आत्म्याने प्रेरित होऊन एखादं महान कार्य करुन जातात आणि मग जन्मोजन्मी कृतज्ञ रहावं इतकं विचार आणि कृतीचं धन ते समाजाला देऊन जातात. अशावेळी त्यांच पुण्यस्मरण करणं हे आपलं कर्तव्य नव्हे का?

महाराष्ट्राच्या समाजकारण आणि राजकारण अशा दोन्ही क्षेत्रातील शीलावर ज्यांनी स्वकर्तृत्वाने स्वतःची वेगळी नाममुद्रा कोरली असा स्वर्गीय आण्णासाहेब लठ्ठे यांचं पुण्यस्मरण आवर्जून करायला हवं. याचं महत्वाचं कारण असं की, स्व. लठ्ठे काही वर्षे छ. राजाराम महाराजांचे दिवाण होते. कोल्हापूर संस्थानचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण होण्यापूर्वी शहाजी छत्रपतीचे घटनाविषयक सल्लागार आणि काही दिवस कोल्हापूरचे पंतप्रधानही होते. हे सारं करत असताना त्यांनी राजकारणाला एक प्रतिष्ठा मिळवून दिली. आणि त्याहीपेक्षा महत्वाचं असं की वेळ आली त्या त्या वेळी त्यांनी सत्तेची खुर्ची सोडली पण आपल्या तत्वांचा बळी जाऊ दिला नाही. आजच्या काळाच्या संदर्भात आण्णासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे हे फार मोठे वेगळेपण आहे.

आण्णांच्या व्यक्तिमत्वाचं वैशिष्ट्य त्यांच्या आणि शैक्षणिक कार्याच्या संदर्भात अधिक प्रभावीपणाने जाणवत रहाते. त्यांनी आपल्या विचारांचा सामाजिक आणि शैक्षणिक विचारांची काही विशिष्ट पध्दतीने सांगड घातली. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा विचार करीत असताना स्त्रीशिक्षणसंदर्भात त्यांचे वेगळेपण ठळकपणाने जाणवते. १९०६ सालापासून द.भा. जैन सभेच्या स्त्रीशिक्षण विभागाचे मंत्री म्हणून ते काम पहात होते. जैन सभेच्या वार्षिक अधिवेशनात बोलण्याचे शिष्यवृत्या देण्यापेक्षा १९०८ साली जैन श्राविकाश्रम ही संस्था उभी करुन स्त्रियांना लिहिणे, वाचणे, हिशेब धर्मकर्तव्य यासारखे व्यावहारिक शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचे काम सौ. ज्ञानमतीबाईच्या मदतीने सुरु केले. कोल्हापूरचे दिवाण म्हणून रुजू होताच स्त्रीसुधारणा म्हणजेच समाजसुधारणा हे सूत्र आपल्या मनाशी ठेवून १९२६ मध्ये बालविवाहाला बंदी घालणारा कायदा करण्यात आला. १० वर्षापेक्षा लहान असलेल्या मुलीचा विवाह आणि १४ वर्षापेक्षा लहान असलेल्या मुलाचा विवाह होऊ नये अशी तरतूद एका कायद्याद्वारे करण्यात आली. असेही त्यांत नमूद करण्यात आले.

प्राथमिक शिक्षण हे सर्वांसाठीच सक्तीचे असावे असे आण्णासाहेबांना मनापासून वाटत होते. प्रागतिक नेते रँग्लर परांजपे हे नव्या मुंबई मंत्रिमंडळात जेव्हा शिक्षणमंत्री झाले तेव्हा प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासंदर्भात त्यांनी काही ठोस निर्णय घ्यावेत असे आण्णासाहेबांना वाटत होते. तसे न झाल्याने तत्कालीन 'राष्ट्रवीर' या साप्ताहिकांतून दोन लेख लिहून त्यांतील महत्वाच्या अडचणीवर नेमकेपणाने बोट ठेवून त्यांतील वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासाठी खरी अडचण पैशाची आहे, असे सांगून आर्थिक बाजूचा विचार केलेला एकही तज्ज्ञ सरकारने नेमलेल्या या समितीत नाही ही वस्तुस्थिती सर्वांच्या लक्षात आणून दिली आणि शाळा खात्यावरचा वाढता खर्च हा अबकारी करांपासून प्राप्त होणाऱ्या अर्थातून केला जात होता. १९२० पासून अबकारी कर कमी होत गेला त्यामुळे शिक्षणावरचा खर्चही कमी करावा लागल्याशिवाय पर्याय नाही, अशी जाणीव त्यांनी स्पष्ट शब्दांत करून दिली. त्यामुळे उच्च शिक्षणासाठी आणि स्त्रीशिक्षणासाठी सरकारचा खर्च झाला तर लोकशिक्षणाची पुन्हा कुचंबणा होईल. हा त्यांनी व्यक्त केलेल्या विचार त्यांची दूरदृष्टीच स्पष्ट करतो.

For www.sahityasagarsangli.com

राणी पार्वतीदेवी महाविद्यालय, बेळगांव इथे सुरु करण्यातही आण्णासाहेबांचा बराच पुढाकार होता. त्या महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे ते अध्यक्षही होते. डॉ. हेरेकर यांच्या निधनानंतर हे महाविद्यालय चालवण्याची जबाबदारीही आण्णासाहेबांकडे आली आणि ती त्यांनी समर्थपणे पेलली. हे महाविद्यालय कर्नाटक विद्यापीठाला न जोडता ते मुंबई किंवा पुणे विद्यापीठाशी संलग्न करु घ्यावे. अशी विनंती महाविद्यालयाने मुंबई सरकारला केली होती. पण ही विनंती मुंबई सरकारने झिडकारली. तेव्हा स्पष्ट शब्दांत आण्णासाहेबांनी सरकारला सुनावले. बेळगांव जिल्ह्याचा काही भाग हा निःसंशय मराठी भाषिक आहे. खुद्द बेळगांव व शहरात मराठी भाषिक बहुसंख्या आहेत. अशा स्थितीत बेळगांव जिल्ह्यातील मराठी भाग तो आजच्या बेळगांव जिल्ह्यात आहे. म्हणूनच केवळ सर्व बेळगांव जिल्हा कर्नाटकातील प्रादेशिक विद्यापीठाच्या कक्षेखाली घालणे चुकीचे आहे. सरकारला जर सर्व कर्नाटक प्रदेश सर्वस्वी कर्नाटक विद्यापीठाच्या कक्षेतच घालावयाचा होता तर तसा तो समाविष्ट करण्यापूर्वी सरकारने प्रथमतः बेळगांव जिल्ह्यातील मराठी भाषिक भाग कर्नाटकात ठेवावयाचा की नाही याविषयी निर्णय घेणे आवश्यक होते. बेळगांव जिल्ह्यातील मराठी भाषिक जनतेस अशी स्वाभाविक भीती वाटत, की त्यांचा कर्नाटक विद्यापीठातील आजचा समावेश हा चंचुप्रवेशानंतर होणाऱ्या मुसलप्रवेशसारखा आहे. या कॉलेजच्या आजच्या निर्णयाचा परिणाम आपणास आगामी कन्नड प्रातांत लोटण्यात येईल असे भय या भागातील मराठी भाषिकांना वाटते. गेल्या ३०–४० वर्षातील काही घडामोडी पहाता आण्णासाहेबांचे विचार खरे ठरले हे प्रत्ययास येते.

कोल्हापूर संस्थाचे दिवाण झाल्यानंतर काही महत्वाचे निर्णय त्यांनी घेतले. साईक्स् लॉ. कॉलेजची स्थापना आपल्या कारकीर्दीत केली. ज्ञानदानाचे काम केवळ दगडाविटांच्या इमारतींनी पूर्णत्वास येत नसते तर खऱ्या अर्थाने ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी तत्पर आणि निष्ठावंत शिक्षकांची आवश्यकता असते हे लक्षात घेऊन शिक्षक तयार करण्यासाठी ट्रेनिंग कॉलेजही उघडले.

शिवाय हिंदुस्थानातील स्त्रियांना कलाकौशल्याचे शिक्षण मिळाल्यास आपले सुख निश्चित वाढेल. त्यांच्या कर्तृत्वासंबंधी आणि कर्तव्यासंबंधी आपल्या कल्पना बदलल्या पाहिजेत. स्त्रियांनी कलाकौशल्याचे शिक्षण घ्यावे आणि स्वावलंबी बनावे यासारख्या त्यांच्या विचाराचे महत्त्वही कालातीत आहे. असं म्हणतात की, खरा समाजसुधारक आपल्या कार्याची सुरुवात स्वतःच्या घराच्या उंबरठ्यापासून करीत असतो. आण्णांसारखा सुधारक यापेक्षा वेगळा नव्हता. १९०७ साली कोल्हापूर येथे जैन श्राविकाश्रम उभा राहिला आणि त्यांच्या उद्‌घाटनादिवशी ज्या तीन स्त्रियांनी आश्रमात प्रवेश घेतला त्यांत सौ. ज्ञानमती आण्णासाहेब लठ्ठे या पहिल्या विद्यार्थिनी होत्या. हे आवर्जून लक्षात घेण्यासारखे आहे. आपल्यापरीने आण्णासाहेबांनी शिक्षणासाठी जेवढे काही करता येण्यासारखे होते त्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली पण हे करीत असताना केवळ विशिष्ट समाजापुरतेच आपले कार्य मर्यादित ठेवले नाही हे ही त्यांच्या कार्याचे एक वेगळेपणच म्हणावे लागेल.

१९१९ साली डेक्कन रयत असोसिएशनचे एक मानपत्र गर्व्हनरसाहेबांस रयत सभेतर्फे अर्पण केले गेले. त्यांत एक अपेक्षा व्यक्त केली होती की, प्राथमिक व दुय्यम शिक्षण मागासलेल्या जातीस विशेष सवलती दिल्याखेरीज त्यांची शिक्षणांत प्रगती होणार नाही. ही अपेक्षा सर्व जातीधर्माच्या सीमारेषा पार करुन शिक्षणाची कवाडे सर्वांसाठी खुली झाली पाहिजेत ही त्यांची भूमिकाच व्यक्त करतो. कोल्हापुरातील जैन बोर्डिंगच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी व्यक्त केलेला आमच्या प्रयत्नांचा हेतूही राष्ट्रीयता हाच आहे. तो साधण्यासाठी आम्ही यथाशक्ती प्रयत्न करीत आहोत. समाजाच्या सर्व घटकांना बरोबरीला आणून हिंदी राष्ट्र बनविण्याचा आमच्या चळवळीचा हेतू आहे. आमच्या प्रयत्नामुळेच जातीद्वेष नाहीसा होणार आहे. हा त्यांचा विचार त्यांच्या भूमिकेवर शिक्कामोर्तबच करतो.

आपल्या विचारांना अशी कृतीची जोड देणारा, अखिल मानवजातीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी झटणारा, स्वामिनिष्ठेसाठी स्वार्थत्याग करणारा आणि अशाश्वत मानवी जीवनाकडून शाश्वत जीवनाकडे प्रवास करणारा हा खरा बहुत जनांचा आधार होता. म्हणूनच त्यांच्या जयंतीदिनी त्यांच्या स्मरणार्थ मान आदराने खाली लवते. स्व. आण्णासाहेबांच्या आजच्या या जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीला विनम्र अभिवादन...